


सर्कसवाला
विंदा करंदीकर


सर्कसवाला



मुद्रक :
मोहन शिराली
मोहन मुद्रणालय
ॲक्मी इस्टेट
शिवडी (पूर्व)
मुंबई ४०० ०१५


पॉप्युलर प्रकाशन
म–४०३

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
पॉप्युलर प्रेस बिल्डिंग
३५सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

पहिली आवृत्ती
१९७५/१८९७

मुखपृष्ठ आणि
आतील चित्रे
व मांडणी :
सुभाष अवचट

CIRCUSWALA
Vinda Karandikar



सर्कसवाला

विंदा करंदीकर

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई



१ आमच्या गावात
सर्कस आली;
खूप खूप
मजा झाली.
त्यात होता
एक हरा,
त्याने केल्या
नाना तऱ्हा :



साहेबासारखा
घालून वेश
ऐटीमध्ये
केलान प्रवेश :
अंगावरती
पिवळा सूट ;
तोंडामध्ये
लाल चिरूट.

घोड्यावरती
झाला स्वार ;
बंदुकीतून
काढलान बार ;
जबड्यामध्ये
घालून हात
वाघोबाचे
मोजलेन दात.

मी ओरडलो,
टाळी देत,
'भले शाबास,
अचाट काम!'
डरा आला
माझ्या बाजूस
आणि केलान
मला सलाम!


२ संध्याकाळी
सर्कस गेली.
मला नाही
झोप आली.

पांघरूण घेतले
किती जाम
तरी दिसायचा
मला सलाम !

शेवटी एकदा
झाली सकाळ ;
आई म्हणाली,
“ अरे बाळ,

ऊठ आता
चूल भर.
सर्कस संपली ;
अभ्यास कर.”





३ अभ्यासबिभ्यास
सारा करून
शाळेकडे
लागलो चालू.
तोच वाटेत
थांबवून मला
"ते पहा."
म्हणाला भालू.

शाळेजवळच्या
चिंचेवरती
एक डरा
होता बसला.
मला वाटले,
मला पाहून
तो थोडा
गालांत हसला.



मी ओरडून
म्हटले त्याला,
"भले शाबास
अचाट काम!"
फांदीवरती
उभे राहून
त्याने केला
मला सलाम.

४ भालू म्हणाला,
"अरे, हा तर
दिसतो कालचाच
सर्कसवाला.
सर्कस सोडून
नाही कळत
हा कसा
इथे आला!"

मी म्हटले,
"त्याला प्रथम
इथेच असणार
मिळाली टाळी,
म्हणून सर्कस
सोडून देऊन
ही स्वारी
इथे आली."

त्या दिवशी
शाळेमध्ये
आमचा अभ्यास
होणार कसा ?
मास्तर आपले
नेहमीसारखे
शिकवीत होते
भसाभसा.

काही मुले
होती वाचीत,
काही करीत
आपले धडे,
मी मात्र
होतो पाहात
खिडकीमधून
चिंचेकडे.


पण चिंचेवर
नव्हता दिसत ;
मी म्हटले,
"गेला असेल."
भालू म्हणाला,
"हळू बोल,
नाही तर
छडी बसेल !

जमाडिजंमत
सांगू नको.
शाळा सुटताच
आपण जाऊ,
आणि आपल्या
डब्यामधील
उरली पोळी
त्याला देऊ."

६

घंटा केव्हा
होते याचीच
आम्ही होतो
बघत वाट.
पेंग येऊ
लागली म्हणून
मास्तरसुद्धा
बसले ताठ.

तोच पडले
दहा टोले.
शाळा सुटली ;
मुले गेली.
मास्तर म्हणाले,
“ आज घंटा
मला वाटते
लौकर झाली.”




इतक्यात भिम्या
धावत आला
आणि म्हणाला,
“ माफ करा,
ही घंटा
माझी नव्हे,
एक डरा...
एक डरा...”



७ चिंचेखाली
डरा होता
नक्की बघत
आमचीच वाट;
आम्ही पोळी
दिल्यानंतर
त्याने काढली
आपली हॅट.

भालू होता
जरा शूर,
तो म्हणाला
"धर पाटी."
पाटी घेऊन
सर्कसवाला
चालू लागला
माझ्या पाठी.






मी म्हटले,
“ भले शाबास ;
तुझे सगळेच
अचाट काम ! ”
पाटीवरती
उभे राहून
त्याने केला
मला सलाम.

८ भालू म्हणाला,
"हे रे काय,
माझीच पोळी !
माझीच पाटी !
आणि साला
सर्कसवाला
करतो तुझ्या
पाठी पाठी.

त्याला सांग,
नीट वाग.
माझे नाव
आहे भालू;
नाही केलान
मला सलाम
तर फोडीन
त्याची टाळू."

मला वाटले
थट्टेत बोलला;
पण संताप
होता खरा;
पाटी हिसकून
त्याच्या हातून
भालू गेला
तरातरा.



९ चालत चालत
आम्ही दोघेच
आलो आमच्या
गोठ्यापाशी.
गोठ्याजवळ
रवंथ करीत
होती उभी
आमची काशी.

सर्कसवाला
उडी मारून
बसला तिच्या
पाठीवरती;
मी म्हटले,
"बस जपून!
नाही तर
जिरेल पुरती.

ही म्हैस
फार झुजरी
तिच्या नाकात
नाही लगाम !"
शिंगावरती
उभे राहून
त्याने केला
मला सलाम !



अंगणामधून
माझी आई
पाहात होती
प्रकार सर्व.
ती म्हणाली,
“बरे झाले.
या काशीचा
जिरला गर्व.

हें माकड
दिसतें शूर ;
आपला मोत्या
अगदी मित्रा.
असले माकड
मिळू शकल्यास
कोण ठेवील
घरी कुत्रा ?”

पण मोत्या
नव्हता मूर्ख
तो मुळीच
भुंकला नाय.
शेपूट हालवीत
पुढे येऊन
लागला चाटू
त्याचे पाय.



११ सर्कसवाला
घरी आला ;
दोन तासांत
घरचा झाला.

अंगणामधला
काढलान केर ;
गडग्यामधला
मारलान घणस !
आणि उद्याच्या
भाजीसाठी
झाडावरून
काढलान फणस.






आईबरोबर
निवडलीन भाजी;
आजोबांचा
कुटलान विडा.
आजी म्हणाली,
"गेल्या जन्मात
कोणी तरी
असणार बडा."


बाबा म्हणाले,
"असेलसुद्धा!
पण निदान
एवढे खरे :
न शिकलेल्या
माणसापेक्षा
हे शिकलेले
माकड बरे!"

बेबी आली
भलतीच खुशीत;
म्हणाली, "झोपनार
कुनाच्या कुशीत?"



१२ तिचाच होता
वाढदिवस ;
जेवणासाठी
होता थाट.
मीच घेतली
पाट-पाने,
पंक्तीत मांडला
त्याचा पाट.

त्या दिवशी
बेबीसुद्धा
नाही म्हणा
'आहि माल
जरी आई
गेली वाढून
तीन लाडू
आधी त्याल



सर्कसवाला
झाला खूष ;
राहिला उभा
पाटावरती ;
तिन्ही लाडू
हवेत उडवून
झेलत बसला
एका हाती !

बेबीने एकदम
वाजवल्या टाळ्या
– गेली विसरून
उष्टा हात –
आम्ही सगळीच
झालो चकित ;
आजोबासुद्धा
राहिले पाहात.

बेबीने पुन्हा
वाजवली टाळी ;
आजी म्हणाली,
"राम, राम."
सर्कसवाला
लवला खाली
आणि बेबीला
केलान सलाम !




१३ जेऊन खाऊन
आम्ही सगळी
ओटीवरती
होतो येत,
सर्कसवाला
आजोबांचा
विडा होता
कुटून देत ;

तोच बाहेर
वाजले बूट
दचकून उठला
सर्कसवाला !
इतक्यामध्ये
एक माणूस
दार उघडून
आत आला.


त्याच्यामागे
होते अनेक ;
त्यात होता
भालूसुद्धा.
मला वाटले,
त्याला धावा
नाकावरती
एक गुद्दा.

माणूस म्हणाला
"माफ करा,
पळून आला
आमचा डरा."
सगळे म्हणाले
घुसत घरात,
"पहिले पकडो,
पीछे बात."





सर्कसवाला
झाला कैद ;
कमरेभवती
कच्च दोरी.
अंगणामधून
त्याला ओढीत
अंधारात
गेली सारी.



१४ घरी सगळी
गप्प गप्प ;
बेबी होती
पार भ्याली.
अंगणामधून
त्याला ओढीत
अंधारात
सर्व गेली.

मी गेलो
अंगणापर्यंत,
—पण अंधार
होता जाम—
म्हणून तिथेच
उभे राहून
मी केला
त्याला सलाम.




सर्कस
किंमत चार रुपये
म-४०३
पॉप्युलर
प्रकाशन